पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/४१६/२०१०
दिनांक- २२/०४/२०१०

प्रति,
मा. .....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक २७.०४.२०१० रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २७.०४.२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
<u>कार्यपत्रिका क्रमांक- १६६</u>

दिनांक- २७.०४.२०१० वेळ- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २७.०४.२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक १३.४.२०१०, २०.४.२०१० व २२.४.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६४) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक- १) सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांचेकडून ३ महिने कालावधीसाठी GISDA Application चे देखभाल व दुरुस्तीचे कामकाज करारनामा न करता व थेट पध्दतीने करून घेणेस आणि त्याकामी येणाऱ्या एकुण र.रू.६,३०,०००/- [र.रू. सहा लाख तीस हजार] चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२७.४.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- २) श्री.अजय जनार्दन सुर्यवंशी यांना महापालिके मध्ये कायदा सल्लागार या पदावर ६ महिने कालावधीसाठी कोणतेही आर्थिक लाभ व सोयीसुविधा न देता फक्त र.रू.२५,०००/- [र.रू.पंचवीस हजार] मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२७.४.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ३) वाय.सी.एम.रूग्णालयासाठी नव्याने आकारण्यात येणारे सी.आर. एक्स-रे चे शुल्क तसेच रक्तामधील तपासणीचे शुल्का बाबतचा प्रपत्र अ क्ष-किरण विभाग व प्रपत्र ब प्रयोगशाळा विभाग यांचे शुल्क तक्ता प्रस्तावा सोबत जोडलेला असून सदर दराच्या आकारणीस माहे एप्रिल २०१० पासून दर लागू करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२७.४.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ४) मनपाच्या वतीने महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त दि.११/४/२०१० ते १४/४/२०१० या कालावधीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन सदर कालावधीत दररोज विविध सांस्कृतिक कार्यक्रम, तज्ञ मान्यवरांच्या व्याख्यानमाला आयोजित करण्यात आलेली असल्याने त्यासाठी मानधन, चहापान, बॅनर, भोजन व्यवस्था, स्मृतिचिन्हे, रांगोळी इ.साठी र.रू.११,५५,०००/- [र.रू.अकरा लाख पंचावन्न हजार] अपेक्षित असल्याने दि.११/४/२०१० ते १४/४/२०१० या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवास थेट पध्दतीने येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ५) मनपाच्या उद्यान विभागा कडील नि.नो.क्र.९/२००९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, ब प्रभागातील मनपाचे विविध उद्यानाचे देखभाल विकास व संरक्षण करणेकामी मे.निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस पुणे (र.रू.२=२४ पै.प्रति चौ.मी. प्रतिमहा) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.२५,३८,०००/- [र.रू.पंचवीस लाख अडोतीस हजार])

विषय क्रमांक- ६) मनपाच्या उद्यान विभागा कडील नि.नो.क्र.९/२००९-१० मधील अ.क्र.२ अन्वये, ड प्रभागातील मनपाचे विविध उद्यानाचे देखभाल विकास व संरक्षण करणेकामी मे.निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस (र.रू.२=२५ पै.प्रति चौ.मी. प्रतिमहा) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.१२,१३,०००/- [र.रू.बारा लाख तेरा हजार])

विषय क्रमांक- ७) संगणक विभागातील Hp Designjet ५०० Plotter चे Carriage Motor बदलने व Plotter दुरुस्ती करणे कामीची तातडीची गरज विचारात घेता निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पध्दतीने कामकाज करून घेणे आवश्यक असून सदरचे Hp Designjet ५०० Plotter, १ नग मे.Quicksoft Services Pune-४३ यांचेकडून दुरुस्ती करणेस व येणाऱ्या र.रू.९,५००/- [र.रू.नऊ हजार पाचशे] चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ८) दि.१४ ते २० एप्रिल, २०१० पर्यंत अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन कामी र.रू.२०,०००/- [र.रू.वीस हजार] खर्च अपेक्षित असल्याने सदर खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ९) नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १०) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.५.४.२०१० ते ११.४.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/३९/२०१० दि.२१.४.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिकलेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ११) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१२.४.२०१० ते १८.४.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४०/२०१० दि.२१.४.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिकलेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील मार्च २०१० मधिल सुधारित एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १३) मे.स्टार फॅब्रिक्स, निगडी यांचेकडून माध्यमिक शिक्षण विभागा साठी २८५ मीटर पडदे मा.सहा.आयुक्त, जनता संपर्क केबिन मध्ये पडदे २० र.मीटर, व मनपाचे माणिक कॉलनी मधील व्यायामशाळेत मॅट १२०० चौ.फुट व पडदे, ८० र.मीटर तसेच मनपाचे रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात खिडक्या व दरवाज्यांसाठी आवश्यक ३२६.५५ र.मी.प्रमाणे एकूण र.रू.१,४७,६४७/- येणार असल्याने पडदे व मॅट खरेदीकामी मे.स्टार फॅब्रिक्स, निगडी यांचे बरोबर मंजूर निविदा दराने वाढीव करारनामा करण्यास व येणाऱ्या एकूण र.रू.१,४७,६४७/- [र.रू.एक लाख सत्तेचाळीस हजार सहाशे सत्तेचाळीस] चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १४) दि.६/३/२०१० पासून पुढील तीन महिने कालावाधीसाठी बांधकाम परवानगी विभागाकडील Auto ACR software Dedicated Server वर जागा आरक्षित करणे, Unlimited Bandwidth उपलब्ध करणे व Web hosting बाबतचे कामकाज करणे इ.कामकाज मागील वर्षी कामकाज केलेल्या दराने प्रतिमहिना र.रू.१८,०००/- याप्रमाणे तीन महिने कालावधीचे र.रू.५४,०००/- इतक्या रकमेस मे.Tech 9 Services यांचेमार्फत करणे आवश्यक असल्याने त्यास आणि सदरच्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १५) सध्या खातेनिहाय चौकशीची प्रलंबित प्रकरणे विचारात घेता, श्री.शां.वि.दरेकर यांना खातेनिहाय चौकशी अधिकारी या पदावर मुदतवाढ देणे आवश्यक असलेने तसेच शासन निर्णय दि.२८/१०/२००९ नुसार विभागीय चौकशी प्रकरणांमध्ये १ अपचारी गुंतलेला असलेस र.रू.८,०००/- व एकापेक्षा अधिक अपचारी गुंतलेले असलेस प्रत्येक जादा अपचाऱ्यामागे र.रू. १०००/- इतके वाढीव मानधन अदा करून दि.१६/४/२०१० पासून १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास, तसेच नोव्हेंबर २००९ पासून सादर केलेल्या एकूण १० प्रकरणांमधील राहिलेले एकूण र.रू.३०,०००/- [र.रू.तीस हजार] वाढीव मानधन अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/४१६/२०१०
दिनांक : २२/०४/२०१० चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.